**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातमीपत्र**

**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:10.03.2026** **वारः मंगळवार**

---

- **प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा क्षेत्रात भारत सक्षमपणे वाटचाल करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन**
- **पश्चिम आशियातल्या संघर्षाबाबत परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांचं संसदेत निवेदन; चर्चेच्या मागणीवरून विरोधकांचा गदारोळ**
- **राज्याचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा आज शपथविधी**
- **आणि**
- **राज्यात रिक्षा परवान्यांचं वाटप स्थगित**

**पंतप्रधान**

**देशभरात आरोग्य क्षेत्रातल्या पायाभूत सुविधा अधिक मजबूत झाल्या असून प्रतिबंधात्मक आणि सर्वसमावेशक आरोग्यसेवा क्षेत्रात भारत सक्षमपणे वाटचाल करत असल्याचं, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. "सबका साथ सबका विकास; जनतेच्या आकांक्षाची पूर्तता", या संकल्पनेवर आधारित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला त्यांनी काल संबोधित केलं. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रात महिलांचा वाढता सहभाग अभिमानास्पद असल्याचं पंतप्रधान म्हणाले.**

**संसद**

**पश्चिम आशियातला तणाव कमी करण्यासाठी मुत्सद्देगिरी आणि संवाद हेच प्रभावी माध्यम असल्याचं, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी सांगितलं. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा कालपासून**

सुरू झाला. पहिल्याच दिवशी परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी दोन्ही सभागृहांमध्ये पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत निवेदन दिलं. पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर सरकारचं लक्ष असून नागरिकांच्या सुरक्षेला आपलं प्राधान्य असल्याचं ते म्हणाले. भारत शांततेच्या बाजूने असून, या भागात निर्माण झालेला तणाव कमी करण्याचं आवाहन करत असल्याचं, जयशंकर यांनी लोकसभेत सांगितलं.

दरम्यान लोकसभेत पश्चिम आशियातल्या परिस्थितीवर चर्चेची मागणी करत विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. यामुळे कामकाज आधी एकदा आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

विधीमंड

पश्चिम आशियात उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाईच्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं अहे. ते काल विधीमंडळ परिसरात वार्ताहरांशी बोलत होते.

विधानसभेत काल अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली. राज्य प्रगती करत आहे असं सरकार सांगतं, मात्र राज्यावर कर्जाचा डोंगर उभा असून राज्य दिवाळखोरीत निघण्याची शक्यता असल्याची टीका सुनील प्रभू यांनी, चर्चेला सुरुवात करताना केली.

राज्य महिला आयोगाला पुरेसा निधी मिळत नसून कर्मचाऱ्यांची कमतरता आहे असा मुद्दा विधानसभेत सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत मांडला. यावर आयोगाकडून जेवढ्या निधीची मागणी होते तेवढा निधी दिला जातो, असं राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितलं.

टी ट्वेंटी विश्वचषक जिंकल्याबद्दल राज्य विधीमंडळात भारतीय संघाचं अभिनंदन करण्यात आलं.

राज्यपाल

राज्याचे नवनियुक्त राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांचा शपथविधी आज संध्याकाळी मुंबईत लोकभवन इथं होणार आहे. मुंबई उच्च न्यायलयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय त्यांना शपथ देतील. जिष्णुदेव वर्मा यांचं काल मुंबईत सपत्नीक आगमन झालं. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री तसंच अन्य मान्यवरांनी त्यांचं स्वागत केलं. लोकभवन इथं नवनियुक्त राज्यपालांना पोलिसांनी मानवंदना दिली.

मुख्यमंत्री-ग्रीनबॉण्ड-नाशिक-माधुरी

आगामी कुंभमेळ्याच्या कामांसाठी नाशिक महापालिकेच्या हरित रोखे काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नॅशनल स्टॉक एक्सचेंजमध्ये सूचीबद्ध करण्यात आले. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महानगरक्षेत्रात सुमारे २५ हजार कोटींची विकास कामं सुरू करण्यात आली आहेत. या विकास कामांचा लाभ केवळ कुंभमेळ्यापुरताच नव्हे तर नाशिक शहर विकासाच्या दृष्टीने होणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. पहिल्या टप्प्यात २०० कोटी रुपयांपर्यंतचे बॉण्ड्स काढण्याकरिता केंद्राने मान्यता दिली होती. याचे यश बघता केंद्रीय अर्थसंकल्पात या बॉण्डची मर्यादा १ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

रिक्षापरवानावाटपस्थगित

इंट्रो-

राज्यातल्या शहरांमध्ये होणारी वाहतूक कोंडी आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे रिक्षाच्या परवान्यांचं वाटप स्थगित करत असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. याबाबत मुंबईत विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलताना ते म्हणाले --

<u>महाराष्ट्र</u>

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सर्व सात जागांसाठीचे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. सत्ताधारी महायुतीकडून बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांचा समावेश आहेत, तर, महाविकास आघाडीकडून ज्येष्ठ नेते शरद पवार हे देखील बिनविरोध निवडून आले आहेत.

<u>पुणेमनपाअंदाजपत्रक</u>

पुणे महानगरपालिकेचं २०२६-२७ या वर्षाचं 13 हजार 995 कोटी रुपयांचं वार्षिक अंदाजपत्रक महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काल स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भीमाले यांना सादर केलं. यात आरोग्य विभागासाठी ८८१ कोटींची तर पाणीपुरवठा विभागासाठी 2 हजार 17 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पीएमपीएमएलच्या ताफ्यात दाखल होणाऱ्या नवीन सीएनजी आणि ई-बसेससाठी ५९२ कोटीं; वाहतूक कोंडी कमी करण्याच्या प्रकल्पासाठी ७४० कोटी, तर पर्यावरणपूरक योजनांसाठी ५१ कोटी रुपयांची तरतूद यात आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष महापालिका आयुक्तांच्या

अंदाजपत्रकात बदल सुचवून ते महापालिकेच्या मुख्य सभेला सादर करतील.

<u>इंट्रो-</u>

रत्नागिरी जिल्ह्यात यंदा हापूस आंब्याचं उत्पादन ८० टक्क्यांनी घटणार असा अंदाज जिल्हा कृषी प्रशासनानेद्वारे नुकताच व्यक्त करण्यात आला. यामागे हवामान बदलासह अनेक कारणं आहेत, त्यापैकी एक महत्वाचं कारण म्हणजे हापूसची कलमं तयार करण्याची वर्तमान पद्धत. पूर्वी रायवळ बाठ्यापासून तयार झालेल्या बाठ्यावर हापूस मातृवृक्षापासून बांधलेल्या कलमानी रोपं तयार केली जात. व्यावसायिक तत्वावर हापूस आंब्याची लागवड रोहयोसारख्या शासकीय योजनांपासून सुरु झाल्यानंतर कॅनिंग आणि रोपवाटिका उद्योग भरभराटीला आले. त्यामुळं व्यवसायिक तत्वावर हापूसचीच बाठ रुजवून त्यावर हापसूचंच कलम केलं जातं. हे तंत्रशुद्ध नाही त्यामुळं आजची आंब्याची उत्पादनाची समस्या होण्याचं एक मोठं कारण आहे असं मत रत्नागिरी जिल्ह्यातील जांभुळआड इथले प्रयोगशील आणि प्रगतीशील शेतकरी जयंत फडके यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केलं....

हळद-मेळावा

हळद क्षेत्रातील व्यापार संधी वाढवण्यासाठी आणि बाजार पेठेतील दुवे मजबूत करण्यासाठी नांदेडमध्ये काल विक्रेता - खरेदीदार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रीय हळद बोर्डच्या सचिव एन. भवानी श्री यांनी जागतिक हळद व्यापारात भारताचं नेतृत्व टिकवून ठेवण्यासाठी दर्जेदार उत्पादनाच्या क्षमतेचं महत्त्व अधोरेखित केलं. यावेळी हळद

लागवडीत उत्पादकता आणि गुणवत्ता वाढविणे, सेंद्रिय हळद उत्पादन तंत्रज्ञान यांसह विविध विषयांवर मार्गदर्शनपर सत्रं घेण्यात आली.

निवड

पुणे जिल्ह्यातील 13 पंचायत समित्यांच्या सभापती आणि उपसभापतींची निवड झाली असून सात पंचायत समित्यांवर महिला निवडून आल्या आहेत. सर्वाधिक १० पंचायत समित्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापन झाली आहे, तर उर्वरित तीन पंचायत समित्या शिवसेना, भाजप आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या ताब्यात गेल्या आहेत.

नाथषष्ठीसोहळा

पैठण इथं काल संत एकनाथ महाराजांचा नाथषष्ठी सोहळा भक्तिभावाने साजरा झाला. निर्याण दिंडीचं समाधी मंदिराकडे प्रस्थान झाल्यानंतर समाधी सोहळ्याचं कीर्तन आणि वारकरी वैष्णव पाद्यपूजन कार्यक्रम पार पडला. हरिपाठ आणि भजनानं कालच्या कार्यक्रमांचा समारोप झाला.

मधाचेगाव

अहिल्यानगर जिल्ह्यात भंडारदरा धरणाच्या परिसरातल्या उडदावणे हे गाव खादी ग्रामोद्योग महामंडळाने मधाचं गाव म्हणून निवडलं आहे. गावातल्या नागरिकांना मधमाशांच्या संगोपनातून मध संकलनाचं प्रशिक्षण देण्यात आलं; तसंच मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांच्या हस्ते नागरिकांना मधुमक्षिका पेट्या वितरित करण्यात आल्या.

हवामान

विदर्भात,मराठवाड्यात काही ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली असून  येत्या 24 तासात राज्यात तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार..